# परिशिष्ट अ
# विक्रीची अधिसुचना

## मालेगांव येथील जिल्हा न्यायाधीश—३ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मालेगांव यांचे न्यायालयात.

**संदर्भ— मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांचे पत्र क्र. जा.क्र. /मोवा/वित्त/१९८/२०२४ दिनांक०९/०१/२०२४.**

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, वर उल्लखिलेल्या संदर्भाकित पत्रान्वये या अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेली जंगम मालमत्ता विकण्याविषयी मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांनी परवानगी दिलेली आली आहे.

सदर विक्री जाहीर लिलाव करून करण्यात येईल व उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मालमत्तेचे गट करून ती मालमत्ता विक्रीसाठी ठेवण्यात येईल किंवा विक्रीचे वेळी तिची गटात विभागणी करून तिचा लिलाव करण्यात येईल.

दरम्यान कोणताही तहकुबीचा आदेश न झाल्यास सदरहू विक्रीचे काम मे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, मालेगांव येथील न्यायालय आवारात दि **१८/०१/२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता चालवण्यात येईल.

विक्रीच्या वेळी उक्त लिलावात स्वारस्य असणा—या सर्व लोकांना जातीने किंवा यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या एजंटामार्फत हजर रहाता येईल.

लिलाव विक्रिच्या इतर शर्ती खालीलप्रमाणे आहेत:—

(१) खालील अनुसूचीत निर्दिष्ट केलेला तपशील न्यायालयाच्या संपूर्ण माहिती प्रमाणे दिलेला आहे. तथापि या उद्घोषणेतील कोणत्याही चुकीबद्यल,खोटया माहितीबद्यल किंवा खोटया तपशिलाबद्यल न्यायालय जबाबदार राहणार नाही.

(२) लिलावातील बोली कोणत्या रक्कमेने वाढवयाची ते विक्रीचे काम चालविणा—या अधिका—याकडून ठरविण्यात येईल. लिलाव किती रक्कमेस मागितला किंवा कोणी मागितला याबाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास संबंधित गटाचे ताबडतोब लिलाव केले जातील.

पान नंबर २ वर

(३) जी कोणी कोणत्याही गटाची सर्वात जास्त किंमत देउ करील त्याला त्या गटाचा खेरीदीदार ठरविण्यात येईल. मात्र नेहमी असे समजावे की, तो बोलीदार लिलाव मागण्यास कायदेशीर रितीने समक्ष असला पाहिजे, आणखी पुढे असे ठरविण्यात येत आहे की, सर्वात जास्त किंमतीच्या बोलीत देउ काढलेली किंमत जेव्हा स्पष्टपणे इतकी अपुरी असल्याचे दिसून येईल की, ती बोली नाकारणे योग्य होईल तेव्हा दंडाधिकारी किंवा विक्रीचे काम चालविणारे अधिकारी हे त्याच्या स्वेच्छा निर्णयानुसार ती बोली नाकारू शकतील.

(४) विक्रीचे काम चालवणा—या अधिकारा—यांला आवश्यक वाटल्यास तो लिलाव स्थगित करण्याची कारणे नमूद करून विक्रीचे काम स्थगित करू शकतो.

(५) प्रत्येकी गटाची किंमत विक्रीच्या वेळी अगर त्यानंतर विक्रीस काम चालविणारा अधिकरी फर्माविल त्या वेळी दिली पाहिजे, व त्यात कसुर झाल्यास उक्त मालमत्तेचा ताबडतोब पुन्हा लिलाव केला जाईल आणि ती पुन्हा विकली जाईल व अशा दुस—या लिलावाचे वेळी जर सदर गटाची किंमत कमी झाली तर मूळ लिलावाच्या वेळी पैसे भरण्यात कसूर करणा—या व्यक्तीकडून विक्रीतील तुटीची रक्कम वसुल केली जाईल, व ती तशी वसूल न झाल्यास ती रक्कम सदर व्यक्तीची जंगम मालमत्ता जप्त करून वसूल केली जाईल.

आमच्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

दिनांक १० माहे ०१ सन २०२४

जिल्हा न्यायाधीश—३ व अतिरिक्त
सत्र न्यायाधीश, **मालेगांव**

**मार्फत —मा. दिवाणी न्यायालय, व.स्तर, मालेगांव**
**प्रत नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी—**

१. म. तहसिलदार, तहसिल कार्यालय, मालेगांव
२. म. आयुक्त सो. मालेगांव महानगर पालिका
३. मालेगांव न्यायालयाचे नोटीस बोर्डवर
४. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगांव

District Judge & Additional Sessions Malegaon Dist. Nashik

पान नंबर ३ वर

# <u>मालमत्तेची अनुसूची</u>

| अ. क्र. | व्ही.एम.आर. नंबर | केस नंबर | आरोपीचे नांव | मालमत्तचे वर्णन | सरकारी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | = | = | — | एक पांढ—या रंगाची मारूती ओमनी व्हॅन क्र. MH-15-R-0003 शासकीय ना—दुरूस्त वाहन (व्हॅन) | मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मालेगांव यांनी ठरविलेली किंमत रूपये १६०००/— |
| | | | | एकुण | १६०००/— |

दिनांक १०/०१/२०२४
मालेगांव

जिल्हा न्यायाधीश—३ व अतिरिक्त
सत्र न्यायाधीश, **<u>मालेगांव</u>**

District Judge & Additional Sessions Judge
Malegaon Dist. Nashik